दि. १५.०३.२०२३

**प्रेस नोट**

**आरोपी लोकसेवक गोविंद तुकाराम सर्जे, वय ४६ वर्ष, पद – सहायक अभियंता, वर्ग – २, ने. शाखा कार्यालय, लातूर शहर क्र.०५, महावितरण, लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक गोविंद तुकाराम सर्जे, पद – सहायक अभियंता यांनी तक्रारदार यांचा सोलार इंस्टॉलेशन चा व्यवसाय असून त्यांनी हाती घेतलेल्या ग्राहकाच्या प्रोजक्ट करिता टेक्निकल फिजीबिलीटी (तांत्रीक योग्यता) देण्यासाठी तक्रारदार यांना सुरूवातीस ३०,०००/– रू. ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि.०९/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि.१०/०३/२०२३, दि.१४/०३/२०२३ व दि.१५/०३/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना त्यांनी हाती घेतलेल्या ग्राहकाच्या प्रोजक्ट करिता टेक्निकल फिजीबिलीटी (तांत्रीक योग्यता) देण्यासाठी शहर क्र.०५, महावितरण, लातूर चे **सहायक अभियंता लाकसेवक गोविंद तुकाराम सर्जे यांनी ग्राहकाच्या प्रोजक्ट करिता टेक्निकल फिजीबिलीटी (तांत्रीक योग्यता) देण्यासाठी तक्रारदार यांना ३०,०००/– रूपयाची मागणी करून तडजोडीअंती २२,०००/– रू लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.**

वरील प्रमाणे आज दि. १५/०३/२०२३ रोजी तक्रारदार १५.५६ वा. सुमारास महावितरण शाखा, लातूर शहर क्र. ०५, लातूर येथे गेले असता आलोसे **गोविंद तुकाराम सर्जे** यांनी त्यांचे कार्यालयात पंचासमक्ष लाचेची रक्कम २२,०००/– रू स्वत: स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक गोविंद तुकाराम सर्जे, सहायक अभियंता महावितरण, लातूर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर, ता.जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास अन्वर मुजावर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलूरे, शाम गिरी, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/संतोष क्षीरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

Scanned with CamScanner